# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्र. 50/2024 दिनांक : 05.02.2024

## 1)जबरी चोरी :–

**लोहा** :–दिनांक 03.02.2024 रोजी चे 18.30 ते 18.45 वा. चे दरम्यान, **लोहा ते गंगाखेड रोडवर मौ. आडगाव फाटयाजवळ ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील अनोळखी चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस लोहा ते गंगाखेड रोडवर आडगाव फाटयाजवळ रोडवर अडवुन खंजरचा धाक दाखवुन थापडबुक्याने मारहाण करून फिर्यादी जवळील मायक्रो फायनान्स बचत गटाचे वसुल केलेले पैसे अंदाजे 25,000/–रूपये असलेली बॅग व फायनान्स कंपणीने दिलेला सॅमसंग कंपणीचा मोबाईल किंमती 8,000/–रू असा एकुण 33,000/–रूपयांचा मुद्येमाल जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर पि. सुरेश आडकलवार, वय 25 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. यादवनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 31/2024 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्री काळे मॅडम, मो. नं. 9922391720** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**वजिराबाद** :– दिनांक 26.01.2024 रोजी चे 16.30 ते 17.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी गोवर्धघाट टेकडी घरकुल नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पत्नी व सुन असे बाजुच्या रूममध्ये स्वयंपाक करीत असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने सदर रूमचा दरवाजाची कडी काढुन आत प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने किंमती 49,900/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अशोक माधवराव पवार, वय 46 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गावर्धन घाट टेकडी घरकुल नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 53/2024 कलम 454, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/126 नागमवाड, मो. नं. 9923126555** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**भाग्यनगर** :– दिनांक 03.02.2024 रोजी चे 23.00 ते दिनांक 04.02.2024 चे 04.00 वा. चे दरम्यान, **विस्तारीत यशवंतनगर पावडेवाडी रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे चार चाकी वाहन क्रमांक टीएस–09/जीसी–7271 टाटा कंपणीची चार चाकी गाडी वाहन एमएच–24/बीआर–4377 क्रियेटा गाडी हया विस्तारीत यशवंतनगर पावडेवाडी रोड नांदेड येथील मोकळया प्लॉटवर उभा केलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरीच्या उदेशाने फिर्यादीचे मुलाचे व फिर्यादीचे शेजारी यांचे गाडयाचे काचा फोडुन 15,000/–रूपयाचे नुकसान करून फिर्यादीचे मुलाचे गाडीतील 700/–रूपये चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी राजेश माधव पैंजण, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. विस्तारीत यशवंतनगर पावडेवाडी रोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 35/2024 कलम 379, 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1333 बोरकर, मो. क्रं. 9112389670** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबीशन :–

**धर्माबाद** :– दिनांक 04.02.2024 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर अंगणात सरस्वतीनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी किंमती 3600/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3092 विठ्ठल भुजंगराव सुपारी, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 21/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोहेकॉ/1181 कुमरे, मो.नं. 8208788324** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड